# जिल्हापेठ पोलीस स्टेशन, जि.जळगाव

फोन ०२५७-२२२९७३३
Email ID : pstn.jilhapeth@gmail.com

Azadi Ka Amrit Mahotsav

जा.क्र. /प्रेस नोट/२०२६, दिनांक १८/०४/२०२६

प्रति,

महाशय, संपादक,

**विषय :-** रिक्षा चोरी करणारा इसम जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे ताब्यात.

--- ००० ---

उपरोक्त विषयान्वये जळगाव शहरातील सिव्हील हॉस्पीटलचे गेट नं.३ मधील पार्किंग मधुन दिनांक १२/०४/२०२६ रोजी एक तिन चाकी ॲपे रिक्षा MH१९BJ४०२५ हि चोरी गेली असल्याने त्यावरुन जिल्हापेट पो.स्टे.ला CCTNS No.१०१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे दिनांक १३/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात प्रभारी अधिकारी जिल्हापेठ पो.स्टे. यांनी जिल्हापेठ पो.स्टे.चे पथक तयार करुन तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या गोपनीय बातमी वरून कल्पेश ज्ञानेश्वर इंगळे हा रामेश्वर कॉलनी मेहरुण येथील राहणारा असून त्याचे जवळ एक पॅंजो रिक्षा आहे. त्यावर आम्ही त्याचा रामेश्वर कॉलनी मेहरुण जळगाव येथे शोध घेतला असता तो जळगाव शहरात गेला असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली होती. त्यावरुन वर नमुद पथक पेट्रोलिंग करीत असतांना सदरची पॅंजो रिक्षा हि पांडे डेअरी चौकातील एम.एस.ई.बी. चे ऑफिस जवळ दिसली तिथे सदरची रिक्षा थांबवुन रिक्षा चालक यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे कल्पेश ज्ञानेश्वर इंगळे, वय ३२, रा.ह.मु.तोंदे ता.शिरपुर जि.धुळे रा.शांती नारायण नगर, रामेश्वर कॉलनी मेहरुण जळगाव असे सांगीतले. त्यावर त्याचे ताब्यातील पॅंजो रिक्षा बाबत विचारपुस केली असता त्याने सदरची पॅंजो रिक्षा हि सिव्हील हॉस्पीटल जळगाव येथून चोरी केले बाबत कबुली दिली आहे. त्या रिक्षाचे वर्णन व किंमत खालील प्रमाणे.

७५०००=०० रु. किं.ची पॅंजो रिक्षा काळा व पिवळा रंगाची तीन चाकी रिक्षा क्रमांक MH१९BJ४०२५

येणे प्रमाणे वरील वर्णनाचे व किंमतीची पॅंजो रिक्षा हि गुन्ह्याचे तपास कामी जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोना कमलेश पवार हे करीत आहेत.

सदर गुन्ह्याचा तपास मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक सो. जळगाव, मा.संदिप गावीत, अपर पोलीस अधीक्षक सो, जळगाव, मा.नितीन गणापुरे, उप विभागीय पोलीस अधिकारी जळगाव, अनिल वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्रभारी अधिकारी जिल्हापेट पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली पोह मिलिंद सोनवणे, कमलेश पवार, तुषार पाटील, गोविंद साबळे, नरेंद्र दिवेकर, प्रविण जाधव यांनी काम केले आहे.

( अनिल वाघ )
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
प्रभारी जिल्हापेठ पोलीस स्टेशन.


स्टेशन, जळगाव
ध्वनी क्रंमाक :0257 222 9733
SMART POLICING